# फुललेलं मौन

(फुलांवरील काव्यसंग्रह - भाग ५)


रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)



मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**फुललेलं मौन** (फुलांवरील काव्यसंग्रह - भाग ५)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता** : २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : मार्गशीर्ष शु. ३, शके १९४७
रविवार, दि. २३ नोव्हेंबर, २०२५

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-995372-0-0

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/-**

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

कधी वाटतं – फुलं बोलतात का खरंच? किंवा त्यांचं मौनच इतकं गहिरं असतं की आपल्याला शब्दांची गरजच उरत नाही? ‘फुललेलं मौन’ ही त्या प्रश्नातून उमललेली माझी काव्यप्रवृत्ती आहे. फुलांबरोबर घालवलेले क्षण, त्यांचा रंग, सुगंध, गंध, आणि त्यांच्या अल्पायुषी सौंदर्याने शिकवलेलं जीवन या सगळ्याचं हे शब्दांमध्ये उमटलेलं दर्शन आहे. मी फुलांकडे नेहमी एक शब्दाशिवाय बोलणारा गुरू म्हणून पाहिलं आहे. ते शांत असतात, पण त्यांचं अस्तित्व बोलकं असतं. ते तुटतात, पण सुगंध देणं थांबवत नाहीत. ते गळतात, पण कधी खंत करत नाहीत. ते शिकवतात की सौंदर्य हे चिरंतन नसतं, पण त्याचा प्रभाव अमर असतो. या कवितांमध्ये मी फुलांचं ‘देहसौंदर्य’ नव्हे, तर त्यांचं ‘आत्मसौंदर्य’ पकडायचा प्रयत्न केला आहे. कळी उमलताना तिचं डोलणं, पहिल्या थेंबानं ओथंबलेली पाकळी, किंवा कोमेजताना येणारी समाधानाची शांतता या सगळ्या अवस्थांमध्ये मला मानवी जीवनाचे अनेक प्रतिबिंब दिसले. मनुष्य आणि फुल यांच्यातला हा आत्मबंध मला नेहमीच भावला. म्हणूनच या संग्रहातील प्रत्येक कविता ही नुसती निसर्गचित्र नाही, तर ती मानवी भावनेचं रूपक आहे. कधी गुलाबासारखं आत्ममग्न प्रेम, कधी मोगऱ्यासारखी सुगंधित साधेपणा, कधी रातराणीचं गूढ शांतत्व, तर कधी जाईचं कोवळं हसू या प्रत्येक फुलामध्ये मी माणसाच्या भावविश्वाला पाहिलं आहे. कधी प्रेम, कधी विरह, कधी स्वप्न, कधी आशा, आणि कधी विस्मरण सगळं काही या फुलांच्या गंधात सामावलेलं आहे.

‘फुललेलं मौन’ हे नाव सुचलं तेव्हा मला जाणवलं फुलांचं मौन हे त्यांच्या फुलण्याइतकंच बोलकं आहे. त्यांचं न बोलणं म्हणजेच त्यांचं गाणं आहे. कवितेचा नादही तसाच ती जास्त बोलली की तिचं सौंदर्य कमी होतं, पण जेव्हा

ती शांतपणे भावनेचा गंध पसरवते, तेव्हाच ती खरी कविता होते. या संग्रहातील प्रत्येक ओळ मला त्याच अनुभूतीतून आली आहे जिथे शब्द आणि सुगंध यांचं विलक्षण नातं आहे.

माझ्या मनात नेहमी एक विचार उमटतो की निसर्गाचं सौंदर्य पाहून आपण तेवढं का नाही जगत, जसं फुलं प्रत्येक दिवस जगतात? ते सूर्योदयाने जागतात, पावसाने ओथंबतात, आणि संध्याकाळी निःशब्द गळून पडतात पण त्यांनी कधी जीवनाचा निषेध केला नाही. त्यांनी फक्त दिलं. हा 'देणं' हा भाव मला माणसात हरवत चाललेला दिसला, म्हणून या कवितांमध्ये मी तो पुन्हा शोधण्याचा प्रयत्न केला. कविता लिहिताना मला जाणवत गेलं की फुलं फक्त बागेत नसतात, ती आपल्या आतही फुलतात. कधी आठवणीत, कधी प्रार्थनेत, कधी अश्रूत, कधी हसण्यात. त्या प्रत्येक क्षणात त्यांचा रंग वेगळा असतो, पण त्यांचा सुगंध एकच अंतरंगाचा. या संग्रहातील कविता म्हणजे त्या आतल्या फुलांच्या उमलण्याची नोंद आहे. वाचक या कविता वाचतील तेव्हा मला आशा आहे ते फुलांना केवळ निसर्गाचा भाग म्हणून नव्हे, तर भावनांच्या आरशात पाहतील. जसं प्रत्येक फूल आपल्याला काही शिकवून जातं, तसंच या कविताही काही न सांगता तुम्हाला गंध देऊन जातील. ते गंध म्हणजेच 'फुललेलं मौन.'

या संग्रहाचं मर्म एका ओळीत सांगायचं तर 'जे शब्दांत नाही सांगता येत, ते फुलांनी सांगितलं.' आणि म्हणूनच या कवितांमध्ये मला माझं आयुष्य, माझं अस्तित्व आणि माझं काव्यसत्त्व सापडलं.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

कधी कधी निसर्ग इतक्या शांततेने बोलतो, की शब्दही लाजतात. त्या शांततेत ज्या आवाजाचा स्पर्श जाणवतो तो म्हणजे फुलांचा. फुलं कधी बोलत नाहीत, पण त्यांच्या प्रत्येक पाकळीत एक कविता उमललेली असते. त्या कवितेचा सुगंध शब्दांत पकडण्याचा हा प्रयत्न 'फुललेलं मौन.'

फुलं म्हणजे केवळ सौंदर्याचं प्रतीक नव्हे; ती जीवनाची सर्वात कोमल भाषा आहेत. त्यांच्या उमलण्यात, गळण्यात, सुगंधात, आणि शांततेत एक संपूर्ण तत्त्वज्ञान दडलं आहे. कवी जेव्हा त्या नाजूक जगाकडे पाहतो, तेव्हा त्याला फुलं म्हणजे भावनांचं दर्पण वाटतात. या काव्यसंग्रहात प्रत्येक कविता म्हणजे एका फुलाशी झालेला संवाद आहे. कधी गुलाब बोलतो, कधी चाफा, कधी जाई, कधी रातराणी, कधी फक्त गळून पडलेली पाकळीच आपली कथा सांगते.

'फुललेलं मौन' या शीर्षकातच एक सुंदर विरोधाभास दडलाय. मौन म्हणजे शांतता; आणि फुलणं म्हणजे उत्सव ! पण जेव्हा शांतता उमलते, तेव्हाच तर खरी कविता तयार होते. प्रत्येक फुलाचं एक व्यक्तिमत्त्व असतं कधी आत्मविश्वासाचा गुलाब, कधी लाजऱ्या मोगऱ्याचं प्रेम, कधी रात्रीचा एकांत उजळवणारी रातराणी, तर कधी साधेपणाचं सौंदर्य घेऊन उभं असलेलं तगरफूल. कवयित्रीने या प्रत्येक फुलाला भावना दिली आहे. ती फुलांशी बोलते आणि ती फुलं तिच्या शब्दांमधून वाचकाशी बोलायला लागतात. बहुतेक जण फुलांकडे सौंदर्याच्या दृष्टीने पाहतात. पण इथे ती केवळ सौंदर्याची प्रतिकं नाहीत; ती संवेदनांची भाषा आहेत. प्रत्येक पाकळीत प्रेम आहे, प्रतीक्षा आहे, धीर आहे. गुलाबाला काटे असतात पण त्याच काट्यांतून तो आपलं अस्तित्व जपत राहतो. तसंच आयुष्यातही आपण दुःखाच्या काट्यांतूनच उमलतो, आणि म्हणूनच ही फुलं आपल्यासारखी वाटतात.

या कवितांमध्ये फुलं केवळ विषय नाहीत ती चरित्रं आहेत. एका गुलाबाच्या श्वासात प्रेमकथा आहे, एका जाईच्या फुलात आठवणी आहेत, तर एका वाळलेल्या फुलात न संपणारी आस आहे.

'फुललेलं मौन' वाचताना वाचकाला जाणवतं आपण फुलं पाहतो, पण त्यांचं मन किती वेळा ऐकतो? या संग्रहात तीच ऐकण्याची क्षमता आहे. कवयित्रीने ज्या तन्मयतेने फुलांकडे पाहिलं, त्याच तन्मयतेने वाचकही त्यांच्या कवितांकडे पाहतात. फुलं आणि मन यांचं नातं अगदी गूढ आहे. मनात जे उमलतं, तेच फुलांमध्ये झिरपतं. म्हणूनच ही कवितासृष्टी फक्त निसर्गाची नाही; ती मनाचीही आहे. कधी फुलं हसतात, कधी रडतात, कधी गप्प राहतात जणू मनासारखंच. त्यांच्या रंगांमध्ये भावनांचे थर आहेत गुलाबी कोमलतेचा, पिवळ्या आशेचा, पांढऱ्या शांततेचा, आणि लाल उत्कटतेचा. कवयित्रीने या रंगांना केवळ नोंदवलं नाही, तर भावनांमध्ये रूपांतरित केलं आहे. म्हणूनच या कवितांमध्ये फुलांचा सुगंध आणि हृदयाचा ओलावा एकरूप होतो. फुलांचं मौन म्हणजे निसर्गाचं सत्य. ते काही सांगत नाही, पण खूप काही सांगून जातं. त्यांच्या गळण्यामध्येही एक पूर्णता असते. जीवनातील क्षणभंगुरतेचं तत्त्वज्ञान ह्याच फुलांनी आपल्याला शिकवलं आहे.

'फुललेलं मौन' या संग्रहात हे तत्त्व अत्यंत सूक्ष्मतेने उमटलं आहे. कवयित्री शब्दांनी बोलत नाही ती शांततेने व्यक्त होते. कधी एखादं फूल गळून पडतं, आणि तिच्या कवितेतून एक नवा अर्थ जन्म घेतो. या कवितांमध्ये शब्द सुगंध घेतात, आणि सुगंध शब्दांत बदलतो. तेवढंच नाही, कवितांचा प्रवास जसा वाचकाच्या डोळ्यांतून होतो, तसाच तो त्याच्या नाकातून, मनातून, आणि हृदयातूनही होतो. जणू कविता नाही, तर एक अनुभूतीचा सुवास. या संग्रहात भाषेचं अलंकरण नाही, फक्त नैसर्गिक सौंदर्य आहे जसं एखादं फूल आपोआप उमलतं, तसं हे शब्द नकळत फुलत जातात. काही ठिकाणी कवयित्री फुलांमधून स्वतःचं प्रतिबिंब पाहते. स्त्रीमन आणि फूल दोघांचंही स्वरूप सारखंच आहे. दोघेही कोमल, पण सामर्थ्यवान; दोघेही सजवले जातात, पण दोघांत एक अंतरिक बळ आहे. फुलं झिजतात, पण सुगंध मागे ठेवतात. स्त्रीही आयुष्य झिजवते, पण प्रेमाचा गंध टिकवून ठेवते. या साम्याचं सौंदर्य या कवितांमध्ये अनुभवायला मिळतं. ती फुलं केवळ सजावटीसाठी नाहीत, ती जीवनाचे आरसे आहेत जे मनातलं प्रतिबिंब

दाखवतात. या कवितासंग्रहात निसर्ग म्हणजे गुरु आहे. फुलं आपल्याला शिकवतात की आयुष्याला सुगंध द्यायचा असेल तर गळणं स्वीकारावं लागतं. त्यांचा मौनपणा म्हणजे निराशा नाही, तर शांतीचा शिखरबिंदू.


'फुललेलं मौन' वाचताना मनाला असं वाटतं आपणही थोडं थांबावं, पाहावं, ऐकावं. त्या शांततेत जे उमलतं, तेच खरं काव्य आहे. प्रत्येक कविता या संग्रहात जणू एक फुलं आहे. काही अजून उमललेली, काही गळून पडलेली, पण प्रत्येकात एकच गोष्ट सुगंधाचं अस्तित्व. हा संग्रह वाचकाला सुगंधी विचारांच्या प्रवासात घेऊन जातो, जिथं शब्द नाहीत, फक्त भावना आहेत. आणि हीच त्या 'फुललेल्या मौनाची' खरी जादू आहे.

**सौ. संध्या पुरंदरे**
पुणे

# अनुक्रमणिका


१) मातीतून विलसावी ... १३
२) अंग श्रीरंगाचे व्हावे ... १४
३) किती जगावे कैसे ... १५
४) गुलमोहराची आली थंडाळी उन्हात ... १६
५) एक मोगरा होता समंजस ... १७
६) बंद काळजाची कळी ... १८
७) नववधूची मोहिनी ... १९
८) पाठवली तू हळवी बकुळी ... २०
९) निजानंदाचे कमळ ... २१
१०) या अबोलीसारखी मी ... २२
११) ऐक ऐक तू बकुळी ... २३
१२) ती आणि मोगरी ... २४
१३) बोल प्रीतीचे ... २५
१४) म्हणून ही सुरंगी सखी वाटते ग ... २६
१५) वासंतिक राग ... २७
१६) दे तनु मज पुष्पवल्ली ... २८
१७) अशी चैतन्ये पसरून जाती ... २९
१८) आत जे आहे सुंदर काही ... ३०
१९) घडते नवेच काही ... ३१
२०) सोनचाफ्या गंधबेड्या ... ३२
२१) ठेव दे देवा अशी ... ३३
२२) छंद कमळ जडू दे न जीवा ... ३४
२३) आजही जेंव्हा पाहतो सुरंगी ... ३५
२४) काट्यातल्या गुलाबा रे ... ३६
२५) हातातल्या गुलाबाने ... ३७
२६) पापणी कोरली येथे ... ३८
२७) रीत कशी मोगऱ्याची ... ३९
२८) अशी पहावी जरा बकुळी ... ४०
२९) फुलराण्यांनो सांगा ... ४१
३०) अरे गोडुल्या फुला फुलांनो ... ४२
३१) पारिजातका अभिजातका ... ४३
३२) फुलोरा फुलांचा ... ४४
३३) वेडी सदाफुली हो ... ४५
३४) तू सोबती असताना ... ४६
३५) श्याम कुसुम तू मी गंधदाणी ... ४७
३६) युगातली दीपिका ... ४८
३७) सुमन जुई ... ४९
३८) ह्रदयात राहता चाफा ... ५०
३९) हातात मोगऱ्याच्या ... ५१
४०) धुंद मोगऱ्याची धुंदी ... ५२
४१) गवतफुलांच्या स्मृती ठेवू या ... ५३
४२) मी क्षितिजास लांघतो ना ... ५४
४३) सांगा गुलाबवेड्या ... ५५
४४) प्रेम उतरले हवे हवे ... ५६

४५) असे असावे
जीवन टवटव ... ५७
४६) उत्सव रम्य पहावा ... ५८
४७) जन्म मिळो
मज फुलाफुलांचा ... ५९
४८) परमेशा,
अगणित तू उरशी ... ६०
४९) स्वप्न हळवा प्राजक्त ... ६१
५०) पुन्हा पुन्हा
मोगऱ्यात दिसशी ... ६२
५१) भाव तुझे दे मला ... ६३
५२) बहर होत जोजवणे ... ६४
५३) सुरम्य जगणे दिसावे ... ६५
५४) पुन्हा एकमेकांस
पहावे नव्याने ... ६६
५५) तुझा चेहरा जणु मोगरा ... ६७
५६) हसऱ्या
जास्वंदीच्या फुला रे ... ६८
५७) सजण्या सजती फुलवंती ... ६९
५८) गंध अलौकिक
पारिजातकी ... ७०
५९) अबोली गाहेरी ... ७२
६०) छेड तू तराणे राजा ... ७३
६१) फुलासारखे
फुलायचे की ... ७४
६२) तरी आसमंती गंध माझे ... ७५
६३) तिची दिवाळी
ऋतूऋतूंची ... ७६
६४) जगता जीवनगाणे ... ७७
६५) सखे तू...
सोनचाफ्याची खणी ... ७८
६६) रंग मनाचे सुमन जाहले ... ७९
६७) तूच मनाचा दिलासा ... ८०
६८) की जांभळाचा
रस मधुरसा ... ८१
६९) ही बाग जांभळी जी ... ८२
७०) तव आठवांच्या फुलांना ... ८३
७१) सखे वाटतेस नवी ... ८४
७२) तुला वाहते
कुसुमी वेणी ... ८५
७३) फुलण्याचं सुख मोठं ... ८६
७४) असे मुलायम
कोडे पडता ... ८७
७५) गोकर्णाच्या
निळ्या जांभळ्या ... ८८
७६) गुच्छ मोहिनी ... ८९



**(१)**

**मातीतून विलसावी**

स्पर्श वल्लरी भाव सुंदरी
कलिका मनोहारी
पुष्प उमलण्या आधी प्रकटे
निर्मिती ही न्यारी

हृदयमंजिरी पराग कणेरी
जन्म जिथे लपला
सुगंध कोठे इथे तिथे ना
अंगांगी छपला

एकावरती एक परती बघ
कोमलता लपटे
हळव्या सुकोमल भावरचनेचे
पांग असे ते फिटे

रंग कोणते अंग कोणते
संग कोण आहे
श्रीरंगाच्या अंतःकरणी
दंग कोण पाहे

कलिका आजची नांदी फुलाची
मुकुलिता हसावी
देठापासून सुरभी कोश घे
मातीतून विलसावी

दि.२६/०६/२०२४
सकाळी ०७.५५ वा.



## (२)
## अंग श्रीरंगाचे व्हावे

गुलाबाच्या पाकळीला
गंध गुलाबीच आला
रंग सुगंध आकार
कोणी ठरवून दिला


कोंब कळीचा डोकवे
फांदीवर पानातून
झाड हळूच सुखावे
त्याच्यामुळे की आतून

कळी कळीदार होते
रेशमाचे अंग ल्येत
आवरणा भेदताना
रूप नवे नवे घेत

आत बांधली पाकळी
उमलते अशी काही
तिच्या मनातील सारे
जणु फुलातुन पाही

आता हासऱ्या फुलाला
कोणी छंद मोहवावे
नाविन्याची प्रीत लाभे
अंग श्रीरंगाचे व्हावे

दि.२३/०६/२०२४
सकाळी ०७.२३ वा.



## (३)
## किती जगावे कैसे

सडा सांडला प्राजक्ताचा
हळव्या प्रभातवेळी
गंधकोश उघडले कोवळे
नाजुक केशरखेळी

इतकी अलगद कशी कोसळती
शब्द न ओठी येती
मूकपणे का बोलत जाती
स्मृती गाठीशी घेती

जेथून येती जन्माला मग
त्या पदतळी नमताना
जीवन करुनी अर्पित जाती
सुखे खुशी गमताना

काय मनी ते असेल त्यांच्या
किती जगावे कैसे
गंधासाठी जग वेडावून
आस उरावी तैसे

जगणे फुलणे गळणे उमलणे
वेचणे ओघळताना
तसेच हासू वाटून द्यावे
आसू नयनी गळताना

दि.१९/०६/२०२४
सकाळी ०७.३४ वा.



(४)

## गुलमोहराची आली थंडाळी उन्हात

पिसारल्या गुलमोहराचा रंग काय
लाल लाल काया आणखी तो काय

झिपारल्या पानापानातुन कोण बोलं
स्वप्नाचा वारा जरा गार गार डोलं

फांदी फांदी डवरली सूर छेडते ना
घामाघूम शरीराचे श्रम तोडते ना

सावलीची सावळीशी खेळी चाललेली
शीतलशा ओट्यावर थंड बोललेली

खोड त्याचं सरळ की जरा वाकलेलं
उन्हं अंगावर घेत बंडी बेतलेलं

गुलमोहराची आली थंडाळी उन्हात
चला नजरेला सुख देऊ त्या भरात

दि.०८/०६/२०२४
रात्री १०.०५ वा.



## (५)
## एक मोगरा होता समंजस

आज पुन्हा तू पाठवलेली
फुले मोगरी आली
जगात माझ्या गंधित हलचल
पुन्हा नव्याने झाली

आठवले ते दिवस सोनेरी
भेटीतील तृप्तता
सुगंध भरला आसमंत तो
प्रीतीतील गुप्तता

एक मोगरा होता समंजस
मध्यस्ती करणारा
मनात रतीमदनाचे वारे
मृदुलपणे भरणारा

स्पर्श मुलायम किती कोवळे
जणू मनाचे रूप
असह्य दाहक ग्रीष्मामधली
मोगरी देई हुरूप

हिरव्या पानोपानी दडल्या
कळ्या मुकुलिता वेड्या
आजही मला आणिक तुजला
बांधती सुरभित बेड्या

ओंजळीत येऊन त्या वदती
मीलन साक्षी आम्ही
परिमळ आमुच्या हृदयी वसतो
समरस प्रेमामध्ये तुम्ही

दि.२८/०५/२०२४
सकाळी ०९.०७ वा.



## (६)
## बंद काळजाची कळी

हिरव्या अळूच्या पानावर
थेंब पाण्याचे जे चार
दव मोत्यांची शोभा ही
स्पर्श दिलाश्याचे गार

रेषा पानाच्या खुलती
पाने वाऱ्याशी डोलती
सृष्टीमध्ये शब्देविन
सारे सारेच बोलती

रंग उमलून येती
ऋतुभराला लेऊन
कळ्या हसतात तेव्हा
गोड फुले ती होऊन

गूज त्यांचेच चालते
एकमेकांशी प्रेमाने
पानं फुलं झुलतात
धुंद हवेशी जोमाने

वाटे दव मी की व्हावे
कधी कलिका फुलेही
बंद काळजाची कळी
अलगदसी खुलेही

दि.२४/०५/२०२४
रात्री १०.२२ वा.



## (७)
## नववधूची मोहिनी

सोन हळदीने माखलेली
ही बहाव्याची नवरी
पाहुनी भवताली दिसते
का अशी ती बावरी

रंग कोणी सांडला हा
स्वर्णकांती मोहना
लुभवितो स्वप्नांसवे
का बहावीच्या मना

अंग अंगांवरती पसरे
वर्ख सोन्याचा जसा
अन मुलामा कोणी दिधला
नव सुखाचा हा असा

हासते ती हासते का
मुरक्या मुरक्या लाजते
प्रीत साम्राज्यात नवखी
प्रेम कहाणी गाजते

रंग येतील नवनवे ते
रोज आता जीवनी
नवरोबाच्या मानसीला
नववधूची मोहिनी

दि.१६/०५/२०२४
सकाळी ०८.१८ वा.



## (८)
## **पाठवली तू हळवी बकुळी**

पाठवली तू हळवी बकुळी
तिची पाकळी खुललेली
कळी कोवळी दडते पानी
कुणावरी ती भुललेली

तिला न माहीत गंध गोडवा
आत केवढी नाजुक ती
उंच उमलते झाडावरती
राधा जणू की भावुक ती

वाट पाहते लपूनछपून का
कोण तिच्या मनी दडलेला
कळले तेंव्हा स्वीकाराचा
रम्य सोहळा घडलेला

तरी अबोल ती गप्प राहते
कुणा न बोले मनातले
ऐकत राहते साहत जाते
बोल बोचरे जनातले

तिच्या मनीचे सख्यास माहीत
सख्या गुपिता जाणे ती
दोघांमधल्या लघववेळा
रम्य सांजेच्या खाणेती

मदन पाहतो देखदेखणे
कुठून प्रीतीचे चोर मळे
किती लपविता सुगंध सांगे
जगतालाही मग ते कळे

लाजलाजते नव्यानव्याने
खुलत राहते तिची खळी
तोही जपतो हृदय दालनी
तिची बावळी ती पाकळी

दि.११/०५/२०२४
दुपारी ०२.३७ वा.



## (९)
## निजानंदाचे कमळ

निजानंदाचे कमळ फुलू दे
समाधान सरोवरी
आत्मानंद हृदयमन्दिरी
स्वर्ग विलसे भूवरी

एक एक पाकळी उमलू दे
दुःख पंक तुडवुनी
परमानंद हा सतत लाभू दे
कोशवृत्ती उडवुनी

अशी उगवता सकाळ प्राची
उजळून दाही दिशा
तेज पसरू दे तमा विसरू दे
जागताना ती जिगीषा

जळ संसारी लाटा कहारी
झोक न जाणे बरे
अहंकाराचा वारा न उपटो
मूळ विसरणे न खरे

जसे हे फुलणे जीवा जीवाचे
तसेच मिटणे आहे
जीवा शिवाचे परम एकदा
मुक्त भेटणे पाहे

दि.३०/०४/२०२४
रात्री ०८.०३ वा.



## (१०)
## या अबोलीसारखी मी

या अबोलीसारखी मी
आज झाले मूक की
बोलण्याची केवढी
होती कधी मज भूक ती


ऐकणारा कोणी माझा
नाही समजून घेतले
आत ओले मनही माझे
वणव्यासम का पेटले

शब्द माझी भूषणे
कोमल सुरांनी दाटली
त्याचवेळी मग दग्यांनी
मन भुई मज फाटली

नजरेतुन ओसंडलेले
द्वेष किती मी साहिले
काळजाच्या माणसांना
पलटता मी पाहिले

जाहले होते जुई मी
जाई प्राजक्ता कळी
आज आहे बघ अबोली
मुसमुसून रडे एकली

दि.२८/०४/२०२४
सकाळी ०७.५३ वा.



## (११)
## ऐक ऐक तू बकुळी

तुला पाहता आठवे
रूप साठवे चढावे
बकुळी ग सानुली तू
गंध अजोड जडावे

गोड सुरभीचे आत
कोष भरले कुठून
सावळ्याशा रंगातही
दिसशी तू उठून

तुला काय म्हणू राणी
तू ग तन्वी नाजुका
जशा पाकळ्या कवळ्या
मनानेही तू साजुका

देणे सारे सारे ठावे
रसिकाला तू सोपवी
तुझ्या गंधाचाच छंद
साऱ्या जगता लपवी

तुला ओंजळीत घेते
गजऱ्यातून माळते
श्वासासवे तू येता
मी रोजची भाळते

ऐक ऐक तू बकुळी
व्हावे तुझी एक कळी
दडते जी पानामध्ये
तिच्या गाली गंध खळी
तिच्या गाली गंध खळी
माझे लाडके बकुळी ....

दि.१६/०४/२०२४
सकाळी ०६.१२ वा.




## (१२)
## ती आणि मोगरी

मोगऱ्याच्या फुलांची करंडी
किती खुणावत राहते न
सुगंधभरल्या डोळ्यांनी
प्रेमाने पाहते न

कधी वाटते अलगद गुंफून
प्रेयसीच्या केसात जावे
कधी फुलांना देवापायी
भक्तिरसात नाहत वहावे

कधी नुसत्याच ओंजळीत
प्रेमाची कबुली देऊ की नको
ह्या गोंधळात कळ्याही म्हणत
बसतात फुलू की नको

किती दाहक उष्म्याच्या
काहिलीचा त्रास
तरीही क्षणात कमी होतो
येताच मोगऱ्याचा सुवास

उगाच वाटत राहते
ती अवचित येईल
मोगरीसारखी तिच्या प्रीत गंधात
मला बुडवून देईल

ती आणि मोगरी
सारख्याच वाटतात
ओसाड रुक्ष वातावरणात
परिमळ देत भेटतात

दि.०५/०४/२०२४
सकाळी ०९.३२ वा.



## (१३)
## बोल प्रीतीचे

बोल प्रीतीचे ऐकण्या
मन अधीरले किती
जन्मभराची प्रतीक्षा
उरी धडधड भीती

आस लागली जीवाला
जीवलग माझा झाला
असे पडताच स्वप्नं
ऋतुराज वनी आला

उमलल्या ह्या कळुल्या
गंधाळून ग पाकळ्या
लाजलाजून हासल्या
गाली गुलाबाच्या खळ्या

अंग अंग शहारले
मनी कारंज फवारे
तुषारांच्या आनंदात
बेभानले प्रीतवारे

आता देशील होकार
जीवनात ये सकाळ
प्रीत जगण्याचे सार
असो प्रेमाचा सुकाळ

दि.०४/०४/२०२४
सकाळी ०९.४८ वा.



## (१४)
## म्हणून ही सुरंगी सखी वाटते ग

सुरंगीच्या गजऱ्यात मन माझे गुंते
तुझ्या भेटीसाठी अजूनही ते खुंते
भेटून दोघे जे बोलत असू ना
सुगंधित क्षण ते मुखी एक हसू ना

हळुवार मी माळताना सुरंगी
तुझ्या केशसंभारी का लाजते ग
उगा का अशी कंपिता होऊनी तू
नजरेस झुकवून अजब वागते ग

जितकी तू जाशील प्रिये दूर दूर
जणू मजसी जवळी तू येण्या खुणावे
असे वाटते पाहुनी मुग्ध चाळे
तुझ्या मीलनी ओढ माझी दुनावे

कसला तो मादक असे गंध वेडा
तोही भुलावा तू इतकी ग लोभस
असे वाटते निरखुनी तुजसी घ्यावे
तुझ्याने हे जीवन करिशी ग शोभस

तुझ्या माझ्या ह्रदयी सुरंगीचे काळीज
मळे सुरभीचे ते अजुनी वाहतात
क्षण मोहणारे तिथेची अजूनी
तुझ्या कुंतली ताजेसे राहतात

म्हणून ही सुरंगी सखी वाटते ग
तिच्याने मनी प्रीत मज दाटते ग
पुन्हा तोच येईल ऋतुराज हासत
सीमा सुखाची चरम गाठते ग

दि.२९/०३/२०२४
सकाळी ०७.४७ वा.



## (१५)
## वासंतिक राग

कुहुकुहू सुरात येते जाग
गा कोकीळ वासंतिक राग
फुलली पाने कळ्या उमलल्या
बहरते मनी प्रीतीची बाग

स्वच्छ सकाळी स्वच्छ नभातून
खगमाळांच्या रांगा उडती
यौवनातल्या गुजगोष्टींनी
पानोपानी कलिका दडती

झुळूक हवेची शीतल येते
थंडावा जगण्याला देते
सुगंध सारे वाऱ्यावरती
अत्तर कुपी उघडूनिया जाते

बने मोगऱ्याची खुलून हासली अन
तिथे जाग गुलमोहराला आली
नभी रंग येती नव्याने नवेसे
नवी दृष्टी सृष्टीत डुंबून गेली

मला वाटते जन्म येथे रूळावा
मधुमास हृदयात ऐसा फळावा
फुलांच्या परागात लपले जे भाव
तुलाही असा भाव सहजी कळावा

दि.२७/०३/२०२४
सकाळी ०८.३८ वा.



## (१६)
## दे तनु मज पुष्पवल्ली

कुसुम आले उमलुनी
रंगात बोलू लागले
पाकळ्यांच्या हिंदोळ्यावर
सुमन डोलू लागले

इवलुसे जगणे की त्याचे
जीव आहे इवलुसा
इवलुशा स्वप्नात रंगे
श्वास त्याचा इवलुसा

केवढा विश्वास त्याच्या
त्या उमलण्यातुन दिसे
राहणे किती काळ न जाणे
तरी परागातुन हसे

सांज होता मिटून घेते
पापण्या अलवार ते
कोश गंधाळून जाती
मस्त मदनी वार ते

रंग किती अन् कोणते
कोणते आकारही
दे तनु मज पुष्पवल्ली
भावफुले साकार ही

दि.२०/०३/२०२४
सायं. ०६.४५ वा.



(१७)

## अशी चैतन्ये पसरून जाती

कुणी न पाहती वनी काननी
उमलून आल्या फुला
ते तर झुलती स्वानंदाचा
आनंदाने झुला

हळूच येते झुळूक गारवी
थंड थंड वाहते
वेलीवरूनी कळी कळुली
वाकून मग पाहते

रंग उमलती सारे सुंदर
खुलवून दे परिसरा
त्यातच येतो लाडिक वाहत
अवखळसा का झरा

मधेच उडती गोड गोडुली
नाचरी फुलपाखरे
वाचून घ्यावी पंखांवरती
रंगमोह अक्षरे

अशी चैतन्ये पसरून जाती
क्षणोक्षणी त्या तिथे
दोन फुले मज मनी उमलती
स्वप्नी रमते मी इथे

दि.१४/०३/२०२४
रात्री ११.२० वा.



## (१८)
## आत जे आहे सुंदर काही

लपून बसला हिरवा चाफा
गंध परी तो लपेल का
आत कोश भरले जे गुणांचे
सांग वेड्या ते छपेल का

जरी वाटले नको दावण्या
उगाच काही जे आतले
सूर्य न लपवे प्रकाश आपुला
बीजांकुरी वृक्ष साठले

आत नदीच्या मधुर जळातून
जीवन वाहे रसरसले
कोण फळातून साखर भरतो
जीवनसत्त्वे घसघसले

मध फुलांच्या परागातले
फूलपाखरा कसे कळले
उंच नभातून कसे उडावे
त्या पक्षांना कसे वळले

आत जे आहे सुंदर काही
प्रत्येका दिधले देवा
मुक्तपणे ते लुटू आनंदे
लपवून त्यासी का ठेवा

दि.०९/०३/२०२४
सकाळी ०८.४१ वा.



## (१९)
## घडते नवेच काही

प्रीतीत मोगऱ्याचा
गजरा फुलून आला
पाहून भाव वेडे
परिमळ खुलून गेला

होती कळी कळी जी
उमलून फुल झाली
दडल्या मनात खोल
प्रेमास जाग आली


गालात हासलेल्या
अवखळ खळ्या स्मराव्या
वाऱ्यासवे बटा त्या
उडत्या करी धराव्या

कानात डूल हलती
करती मला इशारे
बदलून कैशा जाती
आता अशा दिशा रे

घडते नवेच काही
प्रणयास जाग येते
रती कामदेव हृदयी
मोहून बाग होते

प्रीतीत चार हात
दूर नसतो कधीच स्वर्ग
प्रेमात सत्त्व भाव
सकारतील सर्ग

दि.२१/१०/२०२४
उत्तररात्री ०१.०० वा.



## (२०)
## **सोनचाफ्या गंधबेड्या**

सोनचाफ्या काय झाले ना कळताना
पावसाचे अंग झाले उमलताना

एक टोक फांदीवरले का गहिवरले
पान पान आठवांनी का थरथरले

एक गेला पानगळतीचा ऋतू जो
आसवांनी सांडला होता उतू जो

एकटा फांद्यासवे जगताच आला
बागडून मधुमास बहरा धुंद झाला

पल्लवांच्या विभ्रमांना रंग आले
कोवळाले नवनवाले कोंब आले

डोकवून आल्या कळ्या ज्या हासऱ्याशा
अन फुलांच्या हिंदोळी झुलल्या जराशा

पावसाने चुंबिले त्या पाकळीला
उमटूनी आल्या दवांच्या त्या खळीला

सोनचाफ्या लाजणाऱ्या लाजवेड्या
बांधती आम्हा तुझ्या रे गंधबेड्या

दि.२२/१०/२०२४
रात्री ०८.३७ वा.



## (२१)
## ठेव दे देवा अशी

जांभळ्या रंगतली नटवर
फुले जी लाजरी
आत लेऊन डोलती जणु
रेशमाची की जरी


पारदर्शी मन सुमन हे
हळव्या रंगाचे खरे
कोण सांगे कानी कैसे
ल्यायचे रंगा बरे

बीज मातीतून गढता
अंकुराची उगवणी
सोडता जागा स्वयेची
निर्मिती हो देखणी

बीज जाते अंकुरही तो
रोपटे जाते कुठे
जाते कलिका फूल येते
फूल जाऊन फळ तिथे

जीवनाची वेल लगडे
मोद पुष्पांनी जशी
रंग हवे ते वेगळाले
ठेव दे देवा अशी

दि.२५/१०/२०२४
रात्री १०.२८ वा.



## (२२)
## छंद कमळ जडू दे न जीवा

किती टवटवीत कमळफुलें ही
जळात उमलून आली
पंक कितीही लिपटून पायी
उषा नवी तरी झाली

दले पसरली देठाभोवती
विसावुनी जणू झुकलेली
दुःख बुडाशी तरी कमळे ही
दुःख भावना मुकलेली

उगाच नाही आसन होऊन
लक्ष्मीचे खुललेले
अनुरक्तीने नयनकमल हे
प्रियतमास भुललेले

मुखकमळाची शोभा सांगते
हृदयकमल किती गोड
आत्मकमळ उमलून येई तो
नसे कशाची तोड

प्रसन्न कांती कमळफुलांची
हसणारी कुमुदिनी
मृणालिनी दलिनी कमलिनी
सुरेख हो प्रमोदिनी

असे उमलू दे पुन्हा खुलू दे
मना भुलू दे राजीवा
इंदीवर अरविंद पंकजा
छंद कमळ जडू दे न जीवा

दि.०७/११/२०२४
सकाळी ०८.४३ वा.



## (२३)
## आजही जेंव्हा पाहतो सुरंगी

मन का अडकून पडते
सुरंगीत हे माझे
तो काळ सुगंधित सुंदर
आजही हृदयी साजे

उंच कुठे त्या विशाल तरुवर
इवली इवली सुमने
गोड मधुरशा सुवासात जी
धुंद आपुली मने

रंग कांचनी पिवळा पिवळा
स्पर्श मुलायम होई
आजही माझे काळीज सखये
गजऱ्यात सुरंगी होई

किती रमलेला काळ तो होता
मी तू प्रीत भरलेले
तिथेच कोण्या कवीस होते
गीत अमर स्फुरलेले

आजही जेंव्हा पाहतो सुरंगी
आठव होते ताजी
कशी होतसे सखे तू माझी
अनूनयाला राजी

दि.०६/११/२०२४
रात्री ११.५८ वा.



## (२४)
## काट्यातल्या गुलाबा रे

गुलाबाच्या फुला
कसे सांगू राजा तुला
सखी मनामध्ये घर
करू दे न मला

तुझ्या मदतीने तिचे
जिंकावे हृदय
नव्या नव्या प्रीतीचा रे
व्हावा की उदय

राग रुसवे की प्रेम
तुझ्या सोबतीने
वाढू दे रे ओढ आमची
वाऱ्याच्या गतीने

तुझा रंग तुझा गंध
तुझा छंद गोड
दोघांमध्ये तुझ्यामुळे
बंध तो अजोड

काट्यातल्या गुलाबा रे
दुःख तुझ्या तळी
तरी सुखा वाटतोस
फूल की कळी
असशी फूल की कळी

दि.११/११/२०२४
सकाळी ०९.४२ वा.



## (२५)
## हातातल्या गुलाबाने

हातातल्या गुलाबाने
मोगऱ्याला खुणावले
गंधाने धुंद वारे
परिमळ दुणावले

तिच्या केशकलापात
गजऱ्याची वीण
गुलाबाची खोवण
ती रूपगर्विण

कपोलांचे स्पर्श तिच्या
जणू पाकळ्या
उमलून सहवासी
तिच्या येती कळ्या

गाणे कुणीतरी गाते
धुंद धुंद सूर
तिच्या ओढीलागी
माझ्या हृदयाला पूर

रंग तिचा गोरा गोरा
अंग चंदनाचे
गुलाबाचे स्पर्श तिचे
गीत स्पंदनांचे

सांगा तिला कुणीतरी
झुरतो मी इथे
देह मजजवळी परी
मन तिच्या तिथे

दि.१३/११/२०२४
रात्री ११.३४ वा.




## (२६)
## पापणी कोरली येथे

ही पुष्पराणी नाव पापणी
कोरीव डोळ्यावर
जणू लवलेली मदनपापणी
मोहित नयनावर

निळे जांभळे डोळे पाणीदार
विशाल लोचनदल
उघडझाप चालते निरंतर
रमणीची चंचल

काय पाहते कुणास ठाऊक
रानोमाळी राणी
तिच्या भोवती फूलपाखरे
गाती सुंदर गाणी

त्या नेत्रांवर अलगद कोणी
चुंबन का दिधले ते
लाजून लाजून गेली मिटुनी
डोळे गूज वदले ते

आता कोणी येईल रसिक नि
बुडून जाईल तेथे
अशी साजरी किती लाजरी
पापणी कोरली येथे

दि.२३/११/२०२४
रात्री ११.४३ वा.



**(२७)**

## रीत कशी मोगऱ्याची

हसून उमलत्या मोगऱ्याला
कसे सांगावे दुःख
विरहामध्ये अजून वाढते
प्रिया भेट रुख रुख


त्याला काही माहीत नाही
गंध वेडावतो
प्रिया दूरवर जीव खालीवर
किती तो भंडावतो

वर तापती झळा उन्हाच्या
आत आग विरहाची
तशात उमलून डोलून जातो
रीत कशी मोगऱ्याची

तिच्या कुंतली विराजताना
कर माझे गंधाळती
कितीकितीदा मने नव्याने
सौंदर्यी भाळती

नको हसू तू गोड एवढे
ऐक जरा मोगऱ्या
क्षणास करशील दोघांमधल्या
धुंद सुरभीने साजऱ्या

दि.३०/११/२०२४
०६.३४ वा.



## (२८)
## अशी पहावी जरा बकुळी

कुठून आणली नाजूक बकुळी
हार मधुर गोवला
सान कुडी इवली इवली
स्पर्श तिचा कोवळा

श्रीकृष्णाच्या गळ्यात पडली
रंग सावळी बकुळी
पारिजातका सोडून घेतो
श्याम सुंदर बकुळी

गंधाचे हो काय पुसावे
मंद सुगंध दरवळ
फुलली अथवा सुकली तरोही
भुलवून जातो परिमळ

कुठून निर्मितो इतुकी सुमने
हळवी हळवी रसिकवर मने
लाजून रहाते दूर दूरशी
वेडी बकुळी मना लपवणे

अशी पहावी जरा बकुळी
स्मरता स्मरता तिची ती खळी
प्रिया तर माझी इतुकी नाजूक
तनु वेलीवर वदन सदन कळी

दि.०३/१२/२०२४
रात्री ११.१८ वा.



## (२९)
## फुलराण्यांनो सांगा

कशास हसता खुशीत आपुल्या
फुलराण्यांनो सांगा
किती देखण्या लेऊन घेता
अंगोपांगी रंगा

स्पर्श कोवळे मृदू मुलायम
तुमचे हवेहवेसे
गालावरूनी फिरे स्वप्न की
वाटे काही तलमसे

आकारांच्या कथा कुणी ह्या
आणि कितीक सांगाव्या
फुलराणीच्या नित्य नव्याशा
रूपापुढे भुलाव्या

मुकुट कोणता सांगू का ग
सखे पुष्पीनी राणी
गंध आंतरिक तुझा दरवळे
मन हे पाणी पाणी

तुला पाहता दुःख विसरते
लहरून ये चैतन्य
काही नको मज देवा करावे
नित्य कुसुमा अनन्य

दि.२५/०१/२०२५
रात्री १०.४८ वा.




## (३०)
## अरे गोडुल्या फुला फुलांनो

अरे गोडुल्या फुला फुलांनो
रंग किती साजरा
असाच भासे मला प्रियेचा
मुखडा तो लाजरा


तिच्याही गाली उमटून जाते
लाले लाल कधी लाली
रंग गुलाबी ओठांवरती
मोहोरबंद प्रीत झाली

हळव्या हळव्या जशा पाकळ्या
तुमच्या मोहक छान
हळव्या हळव्या तिच्या भावना
भाव मदन दे दान

तुम्हासारखे स्पर्श तियेचे
हलके मऊ हळुवार
ओढ वेगळी मिळवण्यातली
तुम्हास तिजला फार

फुलता तैशी तीही उमलते
सुकता तशी कोमेजे
इतुके साम्य कसे दोघींमधले
उमजे न मजला हे जे

दि.१६/०२/२०२५
रात्री ११.३२ वा.



## (३१)
## पारिजातका अभिजातका

पारिजातके कोमल लतिके
वृक्ष म्हणू तुज कसे
पुष्प सुकोमल अंग मुलायम
स्पर्श रेशमी जसे


रंग शुभ्र अन देठ केसरी
गंध परिमळे उरी
स्वर्ग उतरला कृष्ण स्पर्शाने
अलगदसा भूवरी

किती कौतुके पाहे भामा
ओघळशी शेजारी
रुख्मिणी झाली कृतार्थ जेंव्हा
पावतसे श्रीहरी

साक्ष आजही शुद्ध प्रीतीची
प्राजक्ता तू हो
पारिजातका अभिजातका
अनुरक्ता तू हो

एक पुष्प तरी हाती यावे
वाटत राहे मला
सुवास दरवळ न राहवे अन
ओंजळीत भरे तुला

दि.०२/०३/२०२५
पहाटे ०३.४५ वा.



## (३२)
## फुलोरा फुलांचा

फुलोरा फुलांचा नजारा जरा
पहावा खुलून अन फुलवुनिया मना
कसे हासती क्षण सुमन होऊनी
जणू बांधती गुंफती ते क्षणा

असे रंग अंगावरी पांघरून
नवे रंग देती जरा दाखवून
किती ताजेपण खेळते त्या तिथे
नवे स्वप्नं येते जणू टवटवून

असे स्पर्श जैसे की अलवार कर
मयूरपंख फिरवून गेला कुणी
जरा साठवू कणकणातून रेशीम
अतिशय मुलायम स्मृती का जुनी

मला का लुभवती सुगंधी घडे
न दिसती फुले सौरभी चौघडे
कुणी सांगो वा ना काहीच आता
आपसूक पाऊल तेथे अडे

खुणा काही शोधून घ्याव्यात वाटे
खुणा काही सोडून द्याव्यात वाटे
फुलांच्याच राज्यात हळवे दिलासे
आभाळ आनंदी तेंव्हाच दाटे

दि.०७/०३/२०२५
सकाळी ०९.२१ वा.



## (३३)
## वेडी सदाफुली हो

फुलणे सदाफुलीने
नेहमीच ना ऋतुने
बघ रंगही तिचे ते
ठरले नियम ऋतुने


झाली जरा बदलली
ती रंग न्यारी ल्याली
पिवळ्या धमक शगुनी
मध्ये लाल बुंद लाली

आता स्वतःच वेडी
भुलुनी स्वतःवर गेली
गाली तिच्या उमटली
हसली खुलून आली

जग वेगळेच वाटे
जरी पाने तीच नशिबी
झाली कधीच नाही
तरीही उगा हिशेबी

आपुल्याच प्रेमी पडली
किमया कशी ही घडली
वेडी सदाफुली हो
रंगावर आज अडली

दि.१५/०३/२०२५
सायं. ०६.५३ वा.



## (३४)
## तू सोबती असताना

तू सोबती असताना
चांदणे उन्हाचे होते
गीत एक आपोआप
सारंगी मनाची गाते

तू सोबती असताना
सागरा भरती येते
आकाशाची नदी मग
ओथंबू वाहू पाहते

तू सोबती असताना
मोगऱ्याचा गंध फळे
भर उन्हाळ्यात सखी
सौख्य काय मज कळे

तू सोबती असताना
गुलमोहराची वाट
प्रीत झरे कलश हा
काळजाचा काठोकाठ

तू सोबती असताना
धुंद धुंद धुंदी एक
तू अशी ये जीवनात
गडदशी भाग्य रेख

दि.२३/०३/२०२५
रात्री १०.४९ वा.



## (३५)
## श्याम कुसुम तू मी गंधदाणी

रंग सावळे दलही कोवळे
श्याम कुसुम तू मी गंधदाणी
गर्भरेशमी प्रीत फुलावी
धुंद राधेची ही छंदगाणी


तुझी निळाई मनात भरली
राधा सावळी उरली
जाशी तू जेथें तेथे येईन
राधा सावली ठरली

निळ्या नभातुन मेघश्याम हा
श्याम सावळा राजे
यमुनेच्या लाटांतून आजही
गीत प्रीतीचे गाजे

सांज सावळी रात काजळी
सकाळ श्यामल होते
संध्या समयी आकाशाची
वसुधा प्रेयसी होते

रंग तुझा मी कोरून घेईन
हृदयाच्या पाकळी
स्मित सावळी हसली वेडी
गालावरची खळी

दि.२६/०३/२०२५
रात्री ११.४० वा.



(३६)

**युगातली दीपिका**

चल राधे चल संगे वाजवू
वेणू स्वर मधुराणी
सात सूर ना लाभे आठवा
राधेश्याम कहाणी

झाडावरती पाने होती
फुले कोवळी हलती
गाळून देती अलगद साऱ्या
पाकळ्या जणु कळती

रंग नभाचे रंगून जाती
रोज वेगळे तेथे
राधेसंगे श्याम रमावा
म्हणून का हो येथे

मग छेडता सुर हे सुंदर
उमटून ये गीतिका
प्रेमकहाणी तुझी नि माझी
युगातली दीपिका

हसल्या हसल्या कुमुदिनी या
मृणालिनी भगिनी
सांज खुलावी राग उधळुनी
अनुरागी रागिणी

दि.२८/०३/२०२५
रात्री १०.४३ वा.



## (३७)
## सुमन जुई

जुईच्या नाजूक फुलासारखं
मन माझं राजा
गंध तुला देईन
स्पर्श कोमल अनुभव जा

हळव्या माझ्या भाव पाकळ्या
हळव्या किती कळ्या
वेलीवरती उमलून येतात
मानसीच्या सगळ्या

ऋतू जसे येतात न
हिंदोळते मन
तुझ्यासाठी हळवे रे
या जुईचे तनमन

सुगंधाचा तू वेडा
सुरभित मी
तुझ्या माझ्या प्रीतीने
पुलकित मी

जपशील मन माझं
सुमन जुई
आकाशाचा आधार हो
मी तुझी भुई

दि.१२/०४/२०२५
सकाळी ०६.४८ वा.



## (३८)
## हृदयात राहता चाफा

मनातल्या चाफ्याला
दरवळायला सांगा न
ऋतू कोणताही असू द्या
कळीस फूल व्हायला सांगा न

कधी पहाड लाभे कणखर
रुजण्यास रोपटे आत
कधी मऊशार भूमीच्या
आतून कोंब रुजतात

ना गंध चाफ्याला मिळतो
एक सोनचाफा अपवाद
किती सोसत जातो चाफा
कठीण लोकापवाद

ते गुच्छ काही बोलतात
परी उंच राहतो चाफा
मन गुंतून जाता तेथे
मग हळूच बोले चाफा

कुणी कधीच दखल ना घेती
तरी फुलवून द्यावा चाफा
आत एक कहाणी होईल
हृदयात राहता चाफा

दि.१७/०४/२०२५
रात्री ११.५९ वा.



## (३९)
## हातात मोगऱ्याच्या

हातात मोगऱ्याच्या
कलिकांनो या फुलूनी
माझ्या मनातल्या
मग येतील कळ्या उमलुनी

आवाज चांदण्यांचे
गंधात माखलेले
स्वप्नात जागे झाले
मज स्वप्न राखलेले

आता प्रिया तुझ्या रे
स्मृती आठवात येती
माझ्या मनास तेव्हा
गावात तुझ्या नेती

वाऱ्यासवे इथे मग
हिंदोळतात आशा
समजे तुला का सखया
ही मोगरीची भाषा

असते कधी मी
जेव्हा एकांत बैसलेली
ही मोगरी मनातून
सुरभीस पैसलेली

दि.२२/०४/२०२५
सकाळी ०६.२१ वा.



## (४०)
## धुंद मोगऱ्याची धुंदी

धुंद मोगऱ्याची धुंदी
काही उत्तरच नाही
भर उन्हाळ्यातली सुगंधी पर्वणी
काही सरतच नाही


इकडे वाढताना उन्हाच्या झळा,
जीवाची काहिली होते
तेवढ्यात एक झुळूक मोगऱ्याचा
सुरभित चिंब होऊन येते

मग उन्हाचा त्रास म्हणत
कटकट करावी की
मोगऱ्याचा सुवासाने
मनाची करंडी भरावी

देव पण असा महान आहे खरंच
दुःखाचा असह्य उन्हाळा देताना
सुख कुठेतरी मोगऱ्यासारखं हरखून जावं
एक गोड मोहक सौरभ घेताना

म्हणूनच दुःखाचा उन्हाळा
येऊ द्यावा यायचाय तेंव्हा
सुखाच्या मोगर परिमळात
हलकेसे दिलासे मिळतात जेंव्हा

दि.०१/०५/२०२५
रात्री १०.५४ वा.



इतरांकडूनी वाहवा मिळो वा
मिळतील नावे बोटे
त्यावर अवलंबून आपुले
सुख दुःख हे सारे खोटे

जन्मा आलो फुलणे सुकणे
नित्य नियतीने ठरले
कशास सारे सोडून आपण
नको ते गठडी भरले

## (४१)
## गवतफुलांच्या स्मृती ठेवू या

गवतफुलांच्या बहाराकडे का
लक्ष देते कुणी
स्वच्छंदी ते डोलत जाते
पाहो न पाहो कुणी

असे झाले जर असते मानवा
तुझ्या संगती रे
किती दुःख अन किती वेदना
जीव टांगती रे

कुणी तुडवती तरी न अडती
उमलून येती फुले
तुच्छ तृणांकुर तुच्छ त्याहुनी
लेखती गवतफुले

चला होऊ या आणि जगू या
जरा आपुल्यासाठी
गवतफुलांच्या स्मृती ठेवू या
सदैव आपुल्या गाठी

दि.०८/०५/२०२५
रात्री १२.३६ वा.



## (४२)
## मी क्षितिजास लांघतो ना

फुलल्या कळ्या कळ्यांनी
रंगात रंग भरले
काहीतरी मनीचे
तेंव्हा मनात ठरले

कुजबुजल्या कानी तेंव्हा
उमलून आल्या भावा
लोटून लाट गावा
जातात छंद नावा

येता सुगंध आतून
वाराही नेतो वाहून
खुलते कळी कळीही
ऋतुराज जवळी पाहून

चैतन्य सळसळे अन
भाषा अबोल बोले
आहे कुणीतरी जो
हलकेच मनी डोले

हा आसमंत भाळून
धरणीस सांगतो ना
आता माझ्याच सीमा
क्षितिजास लांघतो ना
मी क्षितिजास लांघतो ना

दि.१५/०५/२०२५
रात्री ११.५८ वा.



## (४३)
## सांगा गुलाबवेड्या

सांगा गुलाबवेड्या
माझ्या मनास थोडे
काट्याविना कसे हे
उलगडून जा कोडे

कवळ्या ज्या पाकळ्या ह्या
दुःखास झेलतात
काट्यांवरी स्वतःला
त्या नित्य पेलतात

का तू उदास होतो
जर बोचतात शल्ये
खरबर हा मार्ग चालून
मग दिसती ही साफल्ये

येतील ऋतू घेऊन
पर्णावली नव्याने
अन झडती पानगळीची
ओसाडशा मनाने

हसरे जरी मुखवटे
हृदयात काही काटे
उजळून आसमंत
तम कोपऱ्यात दाटे

दि.१८/०५/२०२५
रात्री ११.४८ वा.



## (४४)
## प्रेम उतरले हवे हवे

मनास माझ्या नव्या नव्याने
नवीच वाटे उगाच साद
कुणी कोणत्या दिशेने देते
असे वाटते हळवी साद


उगाच येती सुगंध कोठून
वाऱ्यावरती सागर लाट
मनात उठती तरंग शीतल
आनंदाचे वाहून पाट

फुले उमलती रंगही खुलती
फुलपाखरू होते मन
पाऊस पडता मातीमधले
गंधित माझे मन कण कण

आता कुणाच्या हाका ऐकून
असे वाटते गाव मिळे
कुणी सोबती असले तर मग
जगण्यासाठी नाव मिळे

असेच पहावे शून्यामधुनी
चितारलेले चित्र नवे
असेच वाटे नजरेमध्ये
प्रेम उतरले हवे हवे

दि.२८/०५/२०२५
रात्री ११.५८ वा.



## (४५)
## असे असावे जीवन टवटव

हसऱ्या हसऱ्या
उमलउमलल्या पाकळ्या
या कमलिनी कळ्या
रोज सकाळी दवबिंदूंच्या
खुलती गोजिऱ्या खळ्या


रंग गुलाबी लक्ष्मी आसन
ऐश्वर्याची खूण
ऋतू जणू उमलतो फुलातून
वसंत ये दाटून

सरोवराची शोभा कमळं
रंग कमळ शोभा
स्पर्श मुलायम तनु रेशमी
प्रसन्न की आभा

कवितेतल्या उपमांची ही
दिव्य पुराणी खाणी
राजीवलोचन कमलनयन नि
मुखकमळांची कहाणी

असे असावे जीवन टवटव
उत्फुल्ल नि हासरे
सदा घडू दे कमल सुमन हे
कमलेचा वास रे
तुझ्यासवे कमलेचा वास रे

दि.३१/०५/२०२५
दुपारी ०४.२० वा.



## (४६)
## उत्सव रम्य पहावा

रोज उमलत्या किती कळ्यांचा
हिशोब कुणी ठेवावा
रानोमाळी रोज दिवाळी
उत्सव रम्य पहावा

रंग वेगळे छंद आगळे
फुलणे अपरंपार
आकारांची किती ऐश्वर्ये
एक मनी झंकार

पानापानातून रम्यसा
एक आवाज येतो
कोंब कळीचा सौंदर्याने
ओसंडून हा जातो

मुळे सांगती खोडांना की
फांद्या डवरून याव्या
झाडावरुनी दूर दिशांना
गंधराण्या धाडाव्या

दि.०८/०६/२०२५
रात्री ११.४२ वा.




## (४७)
## जन्म मिळो मज फुलाफुलांचा

पिवळ्या धम्मक फुलात कोणी
पहा हळद सांडली
कोमल रेशमी शोभिवंत जणु
आरास हो मांडली


कळ्या कोवळ्या डोकावून त्या
पाहतात हळुवार
तीर तयांचे काळजास मग
जाती भुलवुनी फार

पराग डोके वरती काढुनी
हसती मोदभरे
जणू कुसुमराण्यांच्या मुकुटी
कांचनभरले तुरे

वाऱ्यासंगे सख्य चालते
सुगंध पसराया
पहा फुलांच्या सुंदर रमण्या
दुःख हो विसराया

गालावरती स्पर्श ते हळवे
फुलास फिरवावे
जन्म मिळो मज फुलाफुलांचा
मी ऐटीत मिरवावे

दि.०९/०६/२०२५
सकाळी ०९.०३ वा.



## (४८)
## परमेशा, अगणित तू उरशी

हे परमेशा तुझीच सृष्टी
कुठे कशी तर कुठे कशी
जणू रम्यता दिसे मांडली
रूपे मनोहर तुझी अशी


झाडे वेली जरी सारखी
किती भिन्नता वसलेली
कुठे डोंगरे निवांत बसली
कुठे नदी बघ हसलेली

फुले वाटती फुलांसारखी
तरी रंगसौंदर्य कसे
आकाशातील रंगपंचमी
काही वेगळी इथे नसे

सूर्य उगवतो प्रकाश पडतो
किती भाग्य हे आता कळे
जीवनरूपी रस रसलेले
तुझेच असणे नित्य फळे

तूच स्वतःला नानाविध
स्वरूपात जगातुन उतरवशी
कितीही काही दिले भरभरून
तरीही अगणित तू उरशी
परमेशा, अगणित तू उरशी

दि.१०/०६/२०२५
सकाळी ०५.१० वा.



## (४९)
## स्वप्न हळवा प्राजक्त

स्वप्न माझ्या मनातले
जणु हळवा प्राजक्त
उमलून खुलते रातीला
रंग देठाशी आरक्त

काय वाटे कोण जाणे
सारे तेथे जे हवे
तेच घडते रोज आणिक
भुलविणारे नवनवे

अलगद झोपेतून वेचणे
स्वप्नकळ्यांची होत फुले
फांदीवरती नकळत काही
स्वप्नसुखांचे झुलती झुले

ती नाजूकतेची वीण होतसे
स्वप्न विणावे रोज खरे
सत्यामध्ये तसेच घडले
तर मग भासे किती बरे

भास मोहवून जाती स्वप्नी
ती फुले अन त्या कळ्या
जाग येते अन हाती उरती
स्वप्नकुसुम लडिवाळ पाकळ्या

दि.०१/०७/२०२५
रात्री १२.४३ वा.



## (५०)
## पुन्हा पुन्हा मोगऱ्यात दिसशी

पुन्हा पुन्हा मोगऱ्यात दिसशी
प्रिये तू गंधाची राणी
उमलून आल्या टवटवीत त्या
कळ्यांसवे सुमने आणि

भर उन्हाळ्यातील तप्तशा
झळा अनावर साहताना
जीवनात तू फुलून येते
रूप मोगरी पाहताना

तू आली अन जन्म सोहळे
रोज परिमळे खुलती मळे
तुझ्या मनाचे सुरभित अत्तर
सौंदर्याचे गोड खळे

जशा मुलायम पुष्प पाकळ्या
तुझ्या कपोली तशा खळ्या
मनात आनंदाच्या फुटती
कसे सांगू प्रियतमे उकळ्या

रोज वाटते तुला मिठीतून
सौरभासवे भरताना
दरवळ पसरून जाती चहुकडे
स्वप्नातुन तू उरताना

दि.२८/०७/२०२५
रात्री ०९.०९ वा.



## (५१)
## भाव तुझे दे मला

फुला कोवळ्या गर्भरेशमी
भाव तुझे दे मला
सांग कसा मी वाऱ्यावरती
अलगद घेऊ झुला

फांदीवरती डोलडोलूनी
कसे हसावे बरे
किती वादळातुन ताठ कण्याने
कसे असावे बरे

आनंदाचे परागकण मनी
सांग कसे ठेवावे
प्रिया काळजाच्या समईतून
नित्य कसे तेवावे

गंध देऊनी रसिकवरांना
बोल कसे रिझवावे
आल्हादाच्या पाऊसधारा
बरसून कसे भिजवावे

प्रियाहृदय पाकळीचा आता
कसा मी घ्यावा ठाव
अंतःकरणी तिच्या कसे बरे
माझे कोरावे नाव

दि.२९/०७/२०२५
रात्री ११.२५ वा.



## (५२)
## बहर होत जोजवणे

फुलाफुलांच्या राज्यामध्ये
गंध मळे पसरले
मनामनातील भाव मल्मली
पाकळीत विसरले

हसणे केवळ हसणे माहीत
पुष्प रुदन घडते का
उधाण वारे वादळ वर्षा
दुःख ते सापडते का

आत वेगळे हर्ष धुमारे
परागकण असताना
कशास चिंता नवं घडण्याची
जन्म मुठीत वसताना

रंग निराळे स्पर्श आगळे
छंद सुमन मन वेडे
हळुवार सांगते कुसुम कळीतून
स्वप्नं रोज मज छेडे

रोज उमलते कलिका जीवनी
रोज वेगळे जगणे
म्हणून म्हणते ऋतू ऋतूंना
बहर होत जोजवणे

दि.०२/०८/२०२५
दुपारी ०४.४९ वा.




## (५३)
## सुरम्य जगणे दिसावे

असे वाटते इथे रमावे
निवांत निळ्या नभतळी
सरोवरातील प्रतिबिंबाचे
चित्र मोहवी जळी

पाचू पसरले मन हे विसरले
इथेच मी त्यावेळी
शोधून घेईन स्मृतींस नेईन
भुलून याही वेळी

आकाशातील शुभ्र पांढऱ्या
ढगात स्वप्न हे वाहे
तरंगून मी हलके हलके
त्या नगरीतच राहे

फुले उमलुनी गाती गाणी
सुरेल स्वर सांगाती
पर्वतरांगा निळसर हिरवट
अनवट वाटा जाती

पुन्हा पुन्हा मी इथेच यावे
जरा बसावे हसावे
पुन्हा पुन्हा मज मनास येथे
सुरम्य जगणे दिसावे
सुरम्य जगणे दिसावे

दि.०४/०८/२०२५
सकाळी ०८.१८ वा.



## (५४)
## पुन्हा एकमेकांस पहावे नव्याने

खुणा सोबतीच्या
मनी या जपाव्या
कळ्या मोगरीच्या
मनी मग खुलाव्या

तुझे माझे हातात
हे हात आले
जणू स्पर्श उमलून
नवे धुंद झाले

तुझे माझे हे
शब्द गुंतून जाता
असे अर्थ जगण्यास
येतील आता

नव्या पावलांनी
नव्या वाटा घ्याव्या
नव्या चांदण्याच्या
ह्या भेटी घडाव्या

जरा चालुनी
जात रहावे नव्याने
पुन्हा एकमेकांस
पहावे नव्याने

दि.०५/०८/२०२५
सकाळी ०९.३१ वा.



## (५५)
## तुझा चेहरा जणु मोगरा

फुलांचा गंध दरवळला
कुठे हा मोगरा फुलला
सखे तुजवर पुन्हा वेडा
तुझा प्रियतम असा भुलला

जरी उमलून तो येतो
वनातून अंगणातून वा
कसे भाळून मन जाते
मोहवी मोगरी ताटवा

कशाला सांग हे हळवे
मनाचे चित्र रेखीयले
रंगरूपासवे कुसुमे
सुंदरे ऐसें देखीयले

वाटती दूत प्रीतीचे
सुगंधी अक्षरे होऊन
मनाला भूल त्यांची ही
मदनशर घ्यावे की पाहून

तुझा चेहरा जणु मोगरा
ओढीने ओढतो मजला
होऊनी मोगरा राणी
मी जीवनगंध देई तुजला

दि.१४/०८/२०२५
सकाळी ०८.३२ वा.



## (५६)
## हसऱ्या जास्वंदीच्या फुला रे

हसऱ्या जास्वंदीच्या फुला रे
केशरी रंग बहरला
स्वागत करण्या श्री गणराया
उत्साहची संचरला


पराग डोकावून पाहती
देव निघाला का ते
गजाननाच्या चरणी वाहण्या
जन्म सफल करण्या ते

कळ्या सांगती फुले होऊ या
पटपट आता सारे
देव निघाले स्वर्गामधुनी
निरोप कथिती वारे

उरले केवळ चार दिवस
दुर्वांनो बहरा यावे
रोज आमुच्या सवे तुम्हीही
ईश मस्तकी रहावे

असा सोहळा पुन्हा न होणे
संवत्सर तरसावे
सृष्टीमधल्या कणाकणाने
गजानना हर्षावे

दि.२३/०८/२०२५
सकाळी ०८.०० वा.



## (५७)
## सजण्या सजती फुलवंती

सुकला गजरा जरी वेणीतच
गंध तयाचा विरेल का
ऋतू हवासा मधुमासाचा
पुन्हा माघारी फिरेल का


रोज उमलू दे कळ्या मोगरी
रोज जाईची रम्य फुले
जुई हासू दे वेलीवरती
कुठे अबोली मौन डुले

काट्यामधली कोरांटी अन
बकुळी उंचशा झाडाशी
गंध केवडा वेडा केवढा
मरवा दरवळ हाराशी

मधूमालती सुवर्णचंपा
गुलाब आणिक शेवंती
कुंदकळ्यांच्या धुंद पांढऱ्या
पुष्पवल्ली हो त्या फुलती

सजती फुलवंती
सजण्या सजती फुलवंती

दि.२४/०९/२०२५
रात्री १०.३९ वा.



## (५८)
## गंध अलौकिक पारिजातकी

कुठे उमलला जरी प्राजक्त
आठवण येई प्रीतीची
भार्या प्रेमासाठी जागल्या
एका अनोख्या रीतीची

हट्टा पेटून उठली भामा
गंधफुलांचा बहर हवा
आणा राया माझ्यासाठी
स्वर्गामधला वृक्ष नवा

अंगणी माझ्या केवळ आपण
वृक्ष रोपिला पाहिजे
त्यासव तुम्ही प्रियवरा कृष्णा
भामा गेही राहिजे

मत्सर दाटे सत्यभामेच्या
मनी रुख्मिणी साठीचा
म्हणे या इथे लावा पारिजात
रुख्मिणी घरास पाठीचा

तिथेच हसला गाली प्रभुवर
मनी ठाणीले काहीतरी
फुले तिथे पडतील असा मी
रुजवीन दिव्य तरुवरा परी

हळव्या हळव्या कोमल आपुल्या
प्रियतम रुख्मिणी राणीला
मधुर उपायन देण्यासाठी
काळ योग्य असे जाणीला

जसा लोटला काळ तसा मग
बहरा आला प्राजक्त
सुंदर शोभून शुभ्र कळ्या त्या
देठ केशरी आरक्त

हसला पारिजातक आणि
झुकला अंगणी रुख्मिणीच्या
भामा रडली घडले कसे हे
मनासारखे त्या राणीच्या

कृष्ण सखा मग सांगण्या आला
म्हणे भामा तू ऐक जरा
नको फुकाचा  द्वेष उफाळो
जाळील तुझिया तो अंतरा

जसा मी आहे तसा प्राजक्त
मनःप्रेम जाणतो खरा
मनापासुनी प्रेम रुख्मिणी
करते या श्रीरंगवरा

तुझीही प्रीती माझ्यावरती
लक्ष परी सवती वरती
म्हणून मत्सर येतो हृदयी
भाव द्वेषाचे ये भरती

ती तर केवळ अनन्यभावें
मुरलीधरा मज नित पुजते
मनोमनी वरलेले मजला
सदासर्वदा ती भजते

सोड आता तू द्वेषभावना
शुद्ध होऊ दे चित्त पावना
मिळेल तेंव्हा पारिजातक
आणि पावशील तूही मोहना

गंध अलौकिक पारिजातकी
छंद आगळा जडो तुला
परिमळलेली गोड भामाही
सत्वर मुग्धा लाभो मला

दि.१५/०९/२०२५
रात्री ०९ ४३ वा.




## (५९)
## अबोली गाहेरी

अबोलीच्या मौनातील
रंग कुणी ओळखा
तिचा तिच्या भोवताली
अबोलसा विळखा


कशासाठी शब्द शब्द
भडिमार मारणे
मूकपणे सांगताना
गलका विनाकारणे

काय करायचे आहे
जर कळलेले
शब्द अडथळे तिथे
ज्यांस वळलेले

आत डोकवत जावे
गोंधळ बाहेरी
तिथं बसलेली एक
अबोली गाहेरी

तिचा रंग उमजून
घेत जात रहावे
शब्देविण संवादाला
साक्षीपणे पहावे

दि.२७/०९/३०२५
रात्री १०.४८ वा.



## (६०)
## छेड तू तराणे राजा

छेड तू तराणे राजा
वसंतातल्या बहराचे
तारुण्याच्या उंबरठ्यावर
भाव भरतीला कहराचे

उमलून आल्या यौवनात या
प्रीत कळ्यांच्या बघ डाल्या
फुलाफुलांवर भृंग कामिन्या
मधु प्राशना बघ आल्या

नजर शोधते तुला तुला
नि फक्त तुला रे माझ्या प्रिया
कुठे कुठे नि कुठे कसे रे
शोधु तुला मी सांग प्रिया

न लागे कुठेही मन बावरे हे
वेडे उगाची का मारे फेरे
कोठून येतो आवाज तोचि
शोधून येते किती योजने रे

बांधून ठेवावे वाटे या काळा
जपून ठेवावा मोहक चाळा
पवन वाहून स्पर्श करतो
हळूवारसा मम कपोला

दि ०४/१०/२०२५
रात्री १२.३२ वा.



## (६१)
## फुलासारखे फुलायचे की


फुलासारखे फुलायचे की
रोज नव्याने खुलायचे
रूपरसाळ्या सुगंध मोहक
कशाकशावर भुलायचे

कुणी सोबती असो की नसो
जन्म कशाला कळायचे
श्वासासंगे क्षणाक्षणाला
नवीन जगणे वळायचे

मार्ग एकला तरी न धाकला
दृष्टी भरून पहायचे
नव्या ऋतूंच्या नव्या जगाला
परिमळ हास्ये लिहायचे

माहीत असते सुकायचे परि
क्षणा आजच्या ना मुकायचे
सृष्टी ज्याने रेखीयली त्या
ईश्वरचरणी झुकायचे

दि.११/१०/२०२५
रात्री १२.३७ वा.



## (६२)
## तरी आसमंती गंध माझे

असेच येईन उगवून कोरड्या
ठक्क पाषाणपोटी
मला मिळावे जगण्यासाठी
सुंदर कारणे कोटी

तिथे न पाझर तरीही झरझर
जीवनरस झरताना
रंग कोवळे अंगी लेऊन
जगण्यावर मरताना

असे कोवळे स्वप्न उमलते
रोज एक काननी
रोज नव्याने सूर उमटतील
माझे धुंद गायनी

कुणी असो वा नसो रसिकवर
मी मैफिल सजवावी
एक रीत वेगळी मनातून
मीच पहा रुजवावी

आता होईल कुणी अनुयायी
अथवा कधीच नाही
तरी आसमंती गंध माझे
उरतील मोहक काही

दि १६/१०/२०२५
रात्री ०१.३८ वा.



## (६३)
## तिची दिवाळी ऋतूऋतूंची

इथे चालली प्राजक्ताची
धुंद मोहक दिवाळी
झाडावरूनी टपटप गळती
चांदण पणत्या आळी


पहा अंगणी दीप पेटले
तेज पसरले सारे
शुभ्र दलांच्या पणत्यांमध्ये
केशर ज्योती धुमारे

इवल्या इवल्या लक्ष ज्योतीने
ओवाळती भूमीला
वसुंधरा सौंदर्यवती मग
पहा उजळ अवनीला

दमक दमक दमकून जाते
गंधवती पृथ्वी ही होते
तेज तेजाचे लखलखणारे
रूप स्वतःचे भाळून पहाते

तिची दिवाळी ऋतूऋतूंची
नव्यानव्याने बहरावी
स्वये भूधरा सवे तिज वरा
धुंद धुंदुनी विहरावी

दि.१९/१०/२०२५
रात्री ०९.२५ वा.



## (६४)
## जगता जीवनगाणे

काय सांगणे असेल पहा न
सुंदर कुसुम लतांचे
कोण तयांना भेटत असतील
सोहळे कसे स्वागतांचे


अंगावरती लक्ष चांदण्या
सुगंध कुपी भरलेल्या
मदन बाण त्या अलगद त्यांनी
हृदय कळ्या चिरलेल्या

कुठून येतो गंधित होतो
पवन परिमळे नित्य
रुजणे वाढणे खुलणे फुलणे
सुकणे शाश्वत सत्य

ऋतुऋतूंच्या तऱ्हा आगळ्या
तरीही वेली सज्ज
जितके जीवन तितक्या बहरा
गळतीसही ती सुसज्ज

स्वतःस वाढवत पसरवणे अन
सौरभ देऊन जाणे
असेच यावे तुला मानवा
जगता जीवनगाणे

दि.२४/१०/२०२५
रात्री ११.५३ वा.



**(६५)**

## सखे तू... सोनचाफ्याची खणी

पुन्हा धाडीला तू सोनचाफा
दरवळला मज मनी
गूज जाणिले कुणी सख्या रे
गूज जाणिले कुणी

परागकोशी तुझ्या स्मृती रे
सापडल्या धुंडुनी
आठव आली जुनी सख्या रे
आठव आली जुनी

बंद पाकळ्या उमलल्या कळ्या
रंग सोनेरी गुणी
पिघळली खाण कुणी कांचनी
खाण कुणी कांचनी

स्पर्श सांगतो हर्ष फुलवितो
क्षणात तनी अन मनी
दिले मी प्रिया तुजला वाहुनी
मला रे दिले तुला वाहुनी

तुझी नि माझी हाच जाणतो
गंधमिठी साजणी
तू माझी सोनचाफ्याची खणी
सखे तू... सोनचाफ्याची खणी

दि.११/०२/२०२५
सकाळी ०७.५७ वा.




## (६६)
## रंग मनाचे सुमन जाहले

रंग मनाचे सुमन जाहले
तरीही मनातून अथांग रंग
कधी कोणता प्रकटुन येईल
जमते का मनी तू सांग रंग

इतक्या अगणित छटा जन्मती
प्रमेश्वरही पाहून दंग
कुणास कळले सांगा पाहू
खरेखुरे हृदयातील रंग

कधी कशाने उजळून जाती
आनंदाच्या लहरींवर
कधी दुःखाच्या हेलकाव्याने
छटा काळ्या मनडगरींवर

रंग सुखाचे उमटून यावे
म्हणुनी हट्ट करी काळीज चंग
हिरमुसले बेरंग फिके कधी
अनपेक्षित अनाठायी रंग

वरवरल्या रंगातून बुडणे
कधी होळीची रंगाळी
आत वसे श्रीरंग आपुल्या
तर होईल मनरंग दिवाळी

दि.०५/०४/२०२५
सकाळी ०८.५४ वा.

## (६७)
## तूच मनाचा दिलासा

माझ्या परसात वेली
वेलीवर आल्या कळ्या
कळ्या डुलल्या वाऱ्याशी
वाऱ्याशी हा गंध गेला

गेला रानात वनात
वनात नि काननात
काननात कोण राहे
राहे राजस मनात

मनात काही आहे
आहे सांगायचे तुला
तुला कळणार कधी
कधी प्रीतगंध माझा

माझा प्रियतम तूच
तूच मनाचा दिलासा
दिलासा हा लाभतो ना
ना रे तुजवीण आशा

आशा उगाच फुलते
फुलते न प्रेम भाषा
भाषा जगाच्या वेगळी
वेगळी ही आस राजा

राजा सांगते कानात
कानात रे गुज काही
काही अनुबंध माझे
माझे जुळले तुझ्याशी

तुझ्याशीच जोडले रे
जोडले रे नशीबाला
नशीबाला काय सांगू
सांगू जोड रे आम्हाला

दि.१९/०४/२०२५
सकाळी ०५.३२ वा.



## (६८)
## की जांभळाचा रस मधुरसा

इतका गोड फिका जांभळट
रंग अंगी ल्यालात ग
की जांभळाचा रस मधुरसा
पोटभर तुम्ही प्यालात ग

नजर टाकताच किती
हव्याशा वाटता तुम्ही
नजरेने मनाच्या कलशाने
प्याव्याशा वाटता तुम्ही

कित्ती कित्ती तलम ग
माझ्या मनाच्या पदरांसारख्या
फुलता सुकता माझ्या
भावफुलांसारख्या

तुमच्या कानात सांगू
का ग मनातलं गुज
तुमचं माझं चालत राहू
देत गुपचूप अलगुज

कधी वाटतं कधीतरी
तुम्ही माझं रूप घ्यावं
मी तुमची जागा घेत
वेलीवर डुलत रहावं

दि.०२/०५/२०२५
सायं. ०६.५३ वा.



## (६९)
## ही बाग जांभळी जी

ही बाग जांभळी जी
गेली मनात राहून
फुलले नवेच जगणे
तिजला मी फुलता पाहून


वेड्या खुळ्या उन्हांना
आता तो जोर नाही
मिळते अशी दिशा की
तापास वाव नाही

हे मार्ग पाकळ्यांनी
गेले बुडून सारे
रंगात रंगलेले
आता उनाड वारे

आकाश दूर तेथे
सोडून निज निळाई
झाले खुलून आले
लेऊन जांभळाई

रंगास रंग आम्ही
दिधले जे व्यर्थ काही
खाणाखुणा प्रतिमा
अन त्यास अर्थ नाही

दि.०१/०६/२०२५
रात्री १२.५४ वा.



## (७०)
## तव आठवांच्या फुलांना

तव आठवांच्या फुलांना
कुठे मी सांग दडवून ठेऊ
ती कधी न कोमेजणारी
सुमने कशी लपवून नेऊ

ती आत राहती तरीही
मजला का बेधुंद करती
मी तुझ्यात हरवून बसते
त्या कळ्यांस येते भरती

ते गंध कुठे ना मिळती
ते केवळ स्वर्गसुखाचे
कस्तुरीमृगाची हरिणी
मी रान हिंडे फुकाचे

मी जगते सोबत यांची
सोबतीस तू असतो ना
स्मृती ताज्या होऊन जाता
तू जवळी मज असतो ना

मी म्हणून माळते हृदयी
या आठवणींची माळ
तुज कल्पनाही बघ नाही
मज जीवनाची सकाळ
तू, मज जीवनाची सकाळ

दि.२३/०६/२०२५
रतेय १०.४८ वा.



## (७१)
## सखे वाटतेस नवी

तुझ्या रेशमी मिठीत
सखे जगण्याची आस
तुझ्या हसण्यास येई
जाईजुईचा सुवास

तुझ्या स्पर्शात मला
किती प्रीत जाणवते
तुझा सहवासी मला
नवी सकाळ नवते

तुझ्या कोमल करांनी
स्वीकाराचा भाव जागे
माझे जग उजळते
मन आनंदाने वागे

तूच जगतात माझी
खऱ्याखोट्याची कसोटी
तूच आनंदाची खाण
तूच लाभ सांगिनी की मोठी

क्षणोक्षणी वाटे मला
तुझी साथ हवी हवी
किती कितीदा पाहतो
सखे वाटतेस नवी
रोज हवी नवी नवी

दि.२०/०९/२०२५
रात्री ११.५८ वा.




## (७२)
## तुला वाहते कुसुमी वेणी

तुला वाहते कुसुमी वेणी
जिच्यात दडली गंधित गाणी
त्यावर नाझ्या आत्मरूपाचे
भाव प्रफुल्लित अत्तर पाणी


जगदंबे तू स्वीकारावी
भावफुलांची रंगीत वेणी
भक्ती उमलून येते आणिक
गुज मनीचे सांगेल कोणी

धागा एक तो धरून ठेवील
तुला मला त्या फुलांभोवती
जिवाशिवाचा धागा अखंडित
जन्मोजन्मी नियती ओवील

त्या वेणीतील परिमळ माझ्या
अंतरातला सुगंध देईल
फुलांसवे मन तुझ्या संगती
कुशीत बसण्या दौडत येईल

पुष्प जीवाचे कलिका आधी
मग ते उमलून जगता येईल
वृद्धपणातील सुकणे तरीही
तुला वाहता सार्थक होईल

दि.२६/०९/२०२५
रात्री ११.३१ वा.



## (७३)
## फुलण्याचं सुख मोठं

कसं जमतं फुलांना
रोज नव्याने उमलणं
झुळूक हलकी असली तरी
हिंदोळ्यावर झुलणं

माहीत नसेल का त्यांना
जगणं थोडं अन लगेच सुकणं
सुंदर कवळ्या देहाला
काही क्षणात मुकणं

मला वाटतं माहीत असेल
नक्कीच सारं काही
फुलण्याचं सुख मोठं
त्यापुढे सुकणं काहीच नाही

डवरून यायचं
कळीचं फूल व्हायचं
ऋतुसंगे सारे ऋतू
भोगत उपभोगत पुढे जायचं

दुःखाचे वारे येतात
कळ्यांच्याही वाट्याला
तरी हसतात स्वागताला बसतात
गिणत नाहीत काट्याला

एकंच ठरवावं जगताना
क्षण आलाय न, कळीचं फूल व्हायचं
आपल्यात रमून जात
संकटांसाठीही भूल व्हायचं

दि. ०२/०१/२०२३
सकाळी ०९.३५ वा.



**(७४)**

## असे मुलायम कोडे पडता

कसे कोवळेपण मोजावे
कशा तलमता कोणी
फुलाफुलांच्या नाजुक राज्या
मध्ये जा राहोणी

बीज इवलुसे महाकाय
तरुवरास सामावणारे
वरवर दिसते टणक नि राकट
आत मऊपण सांभाळणारे

कोंब जो फुटतो कवळा मोही
आविष्कार मनाला
स्पर्श कोवळे दिसणे तैसे
भुरळ पडते जनाला

वाढत जाते रोप भराभर
वरवर कणखर बाणा
आत पालवी कळी फुलांची
पाकळी कवळी जाणा

त्याहून नाजूक पराग बसती
पुन्हा उत्पत्ती सार
असे मुलायम कोडे पडता
आठवतो ईश फार

दि.१९/०९/२०२४
सकाळी ०९.१६ वा.



## (७५)
## गोकर्णाच्या निळ्या जांभळ्या

गोकर्णाच्या निळ्या जांभळ्या
ताज्या तवेल्या फुलांनो
वेलीवरूनी खुडले जाऊन
जरा विसावा फुलांनो

शिवलिंगावर अर्पित होण्या
उत्सुक कोमल काया
नसेल परिमळ तरीही भक्तीचा
सुगंध भरला फाया

कशास तुम्ही हिरमुसता हो
रंग किती देखणा
नसेल गंध परि प्रिय कुणा तुम्ही
स्वये शिवा देख ना

उमलून सारे जीवित व्हावे
सार्थक जर पिंडीवर
जगणे याहून असेल कैसे
सांगा हो अति सुंदर

भूतली येता कैलासाची
सफर तुम्हा लाभते
शिव सान्निध्ये जन्मच नाही
मरण सार्थ लागते

दि.२३/०९/२०२४
सकाळी ०९.२१ वा.



## (७६)
## गुच्छ मोहिनी

गुच्छ फुलांचे म्हणू तुम्हां की
भावभावना मनीच्या
जन्मासंगे अवतरता तुम्ही
खुणा जणू गतजन्मीच्या

रंग धवल कधी रंग निराळे
आकाशाशी भिडणारे
परागतंतू जणू कामना
अवकाशातून उडणारे

बीज कोठले संचित ठरते
भूमिखाली कर्माच्या
फलित होऊनी भोग भोगणे
कर्तव्याच्या धर्माच्या

गतकाळाची भूमी होईल
आधाराला पायाशी
कर्म रेखणे वर्तमान जो
भविष्य घडे आकाशाशी

सारे सारे परस्परांशी
जुळले जातील अफलातून
गुच्छ मोहिनी जीवन ठरतील
सुगंध पसरून मग आतून

दि.२५/०९/२०२४
सकाळी ०९.३२ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

''**साहित्यिक व्रत**'' म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप, श्रीरंग (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री, सहा सोहळे (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी, कामिनी, फुललेलं मौन (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, क्षणांचं देण, आयुष्याचं गाव (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, दरवळ तुझे नि माझे (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया - कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया), गंधराणी (मिश्र कविता), श्रावणी (पाऊस कविता), उल्का (गझल), तेंव्हा (वेळा), नभ मोजताना (धरती-आकाश), जरा रेंगाळले (वाट), रंगतनु, कृष्णकांत (रंग), कविता माझी, लोभसवाणी (सर्वोत्कृष्ट कविता), कवडसा, मृण्मयी, अबोली, अनावर मना, मल्मली, अक्षरा, अनुरंग, नवी नवेली, मन ओथंबुन गेले, उमलवाट, (मिश्र कविता) मन मनुल्या (मन), निरव नमन (अध्यात्म), यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(मन) – वेध मनाचा, शब्द पाखरं, मन मोहरून माझे, (निसर्ग) – सुख सुखाचं, पानापानातली कथा, (प्रीत त्याची तिच्यासाठी) – शब्द तुझ्या नावाचे, (पशु–पक्षी – घरटे) स्पंदन रेषा, (सुख–दुःख) – सुखाचा किनारा, (नाती) – थांब जरा तू, (गंध–सुगंध) – दूर त्या तिथे, आनंद गंधपाणी, (स्त्रीजीवन) – उडण्या हे आभाळ, (चंद्र आणि लज्जा या भावनांवरील कविता) – घडते नवेच काही. (संस्कृत बाल काव्यसंग्रह) – बालमोदिनी, सुधा मूर्ती यांच्या 'तीन हजार टाके' या मराठी पुस्तकाचा संस्कृत अनुवाद – त्रिसहस्रसीवनम्, (संस्कृत अनुवाद) – मनुष्यः.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१

- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/ @maha_governor 1439559856764030979 ?s=08 <https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद डॉ. कुलकर्णी यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com //lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/ ?utm_source=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653335052919&id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम - ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम - ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग - १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग -२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ११६
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : १६
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •